शुल्क परताव्यात तांत्रिक अडचणी

दहावी, बारावीचे ८६ हजार विद्यार्थी परताव्यापासून वंचित

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे दहावी आणि बारावीच्या एकूण ५ लाख ९९ हजार ६४ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्य मंडळाने सुरू केलेल्या शुल्क परताव्याच्या प्रक्रियेला तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. आधार क्रमांक चुकीचे असणे, खाते बंद असणे, खाते आधार संलग्न नसणे अशा कारणांमुळे आतापर्यंत ८६ हजार ३५ विद्यार्थ्यांना शुल्कपरताव्याची रक्कम पोहोचलेली नाही.

राज्यातील १५ जिल्ह्यांतील ४० तालुके, तसेच १ हजार २१ महसूल भागांमध्ये दुष्काळसदृश स्थिती जाहीर करण्यात आली. त्यानुसार राज्य मंडळाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी विद्यार्थी, पालकांच्या आधारसंलग्न बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने रक्कम जमा करण्यासाठी माहिती मागवली. त्यासाठी सहा वेळा मुदतवाढ देण्यात आली. या कालावधीत दहावीचे ३ लाख ४८ हजार ९४२, तर बारावीचे २ लाख ५० हजार १२२ विद्यार्थ्यांची माहिती संकलित झाली. या विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क रक्कम २९ कोटी २५ लाख ५३ हजार १६० रुपये होती. तसेच शुल्क परतावा ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य शासनाकडून या योजनेसाठी २०२३-२४साठी ८ कोटी ९० लाख रुपयांचा निधी राज्य मंडळाला देण्यात आला. त्यानंतर राज्य मंडळाने दहावीच्या १ लाख १३ हजार ६४२ विद्यार्थ्यांना, तर बारावीच्या ७४ हजार १०६ विद्यार्थ्यांना शुल्क परताव्याची प्रक्रिया सुरू केली. मात्र दहावीच्या ५६ हजार १५५, तर बारावीच्या २९ हजार ८८० अशा एकूण ८६ हजार ३५ विद्यार्थ्यांच्या खात्यात शुल्क परताव्याची रक्कम जमा झाली नाही. त्याबाबत बँकेने दिलेल्या अहवालानुसार आधार क्रमांक चुकीचे असणे, खाते बंद असणे, खाते आधार संलग्न नसणे, खाते गोठवलेले असणे अशी कारणे असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ३ कोटी ९२ लाख ५६ हजार ५८० रुपयांचा निधी राज्य मंडळाकडे शिल्लक राहिला. हा निधी योजनेतील उर्वरित ८० हजार ४५५ विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी बँकेला देण्यात आला आहे. तर योजनेसाठी आवश्यक असलेला उर्वरित निधी शासनाने दिल्यानंतर अन्य विद्यार्थ्यांनाही शुल्क प्रतिपूर्ती केली जाणार आहे.

तांत्रिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांबाबत विभागीय मंडळांच्या माध्यमातून तपशीलाची दुरुस्ती करण्यात येत आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना शुल्क परतावा करण्यात येणार असल्याची माहिती राज्य मंडळाने दिली.

कापूस-सोयाबीनसाठी प्रतिहेक्टरी पाच हजार अनुदान

पुणे : हमीभावापेक्षाही कमी दर मिळाल्यामुळे २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, खरीप हंगाम २०२३ मध्ये कापूस आणि सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्याने झालेल्या नुकसानीवर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे, दोन हेक्टरपर्यंत मदत देण्याच्या निर्णय घेतला आहे. पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या आधार, बँक खात्याशी संलग्न माहितीचा वापर व्हावा यासाठी त्यांचे वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक ना-हरकत पत्र कृषी सहाय्यकाकडे जमा करावे. संबंधित उत्पादक असलेल्या आणि ई-पीक पेऱ्यांची नोंदणी केली आहे, अशा सर्व शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

दैनंदिनी

पुस्तक प्रदर्शन : अक्षरधारा बुक गॅलरी, राजहंस प्रकाशन, पुस्तकांचा मान्सून सेल, स्थळ - आचार्य अत्रे सभागृह, बाजीराव रस्ता, सकाळी १० ते रात्री ८.३०

छायाचित्र प्रदर्शन : सरस्वती बुक कंपनी, आदर्श विद्यार्थी प्रकाशन, रमेश कुंदूर यांनी टिपलेल्या कैलास पर्वताच्या छायाचित्रांचे प्रदर्शन, स्थळ-यशवंतराव चव्हाण कलादालन, कोथरूड, स.१० ते रात्री ८

चित्रप्रदर्शन : कलागजर, फ्रान्सिस न्यूटन सुझा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सुझा यांच्या चित्रांचे प्रदर्शन, स्थळ - पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट्स, ज्योत्स्ना भोळे सभागृह, टिळक रस्ता, सकाळी १०.३० ते सायं. ७.३०

चित्रप्रदर्शन : मोनालिसा कलाग्राम आणि आयजीए गॅलेरिया, करोना संसर्ग काळावर आधारित 'वन्स अपॉन अ टाइम, अ पॅण्डेमिक', चित्कला रमेश यांचे ॲक्रेलिक माध्यमातील चित्रांचे प्रदर्शन, स्थळ - मोनालिसा कलाग्राम, कोरेगाव पार्क, सकाळी ११ ते सायं. ७

सन्मान : रंगत-संगत प्रतिष्ठान, कल्पना दुधाळ यांचा सन्मान, हस्ते - डॉ. बुधाजीराव मुळीक, 'मल्हारधून' पावसाच्या कविता, कविसंमेलन, स्थळ - पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, सकाळी ११

ग्रंथ प्रकाशन : महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल, विश्वास पाटील लिखित 'अण्णा भाऊ अपहोल्डर ऑफ दलित अँड वूमन लिटरेचर' या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशन, हस्ते - शरद पवार, प्रमुख उपस्थिती - विनोद तावडे, अध्यक्ष - डॉ. रावसाहेब कसबे, स्थळ - बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, सकाळी ११

फॉर्म नं. INC–19
सूचना
[कंपनी (समावेश) नियम, 2014 च्या नियम 22 नुसार]

1. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनी कायदा, 2013 च्या कलम 8 च्या पोटकलम (5) च्या अनुषंगाने, प्रादेशिक संचालक, एव्हरेस्ट 5 वा मजला, 100 मरीन ड्राइव्ह, मुंबई–400002 यांना आत्मसमर्पण/परिवर्तनासाठी अर्ज करण्यात आला आहे. कंपनी कायदा, 2013 च्या कलम 8 अंतर्गत नारी संवेदना वुमन एम्पॉवरमेंट फाउंडेशन धारण केलेला परवाना.
2. कंपनीचे मुख्य उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहेत:
"कुंडली, टॅरो कार्ड रीडिंग, पाम, फेस रीडिंग, ग्राफोलॉजी आणि इतर प्राचीन शास्त्रांच्या अभ्यासावर आधारित समग्र आध्यात्मिक उपाय, ज्योतिषीय सल्ला आणि मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी आणि ग्राहकाच्या विश्वासानुसार विधी पार पाडण्यासाठी मदत करणे."
3. मसुदा मेमोरँडम आणि प्रस्तावित कंपनीच्या लेखांची एक प्रत A9, H.No 201 करिष्मा सोसायटी जवळ संगम प्रेस कोथरूड, पुणे, पुणे, महाराष्ट्र, भारत, 411038 येथे पाहता येईल.
4. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, या अर्जावर आक्षेप घेणारी कोणतीही व्यक्ती, फर्म, कंपनी, कॉर्पोरेशन किंवा कॉर्पोरेट संस्था अशा आक्षेप प्रादेशिक संचालक, एव्हरेस्ट 5वा मजला, 100 मरीन ड्राइव्ह, मुंबई–400002, महाराष्ट्र यांच्याकडे तीस दिवसांच्या आत कळवू शकतात. ही सूचना प्रकाशित झाल्याची तारीख, प्रादेशिक संचालकांना संबोधित केलेल्या पत्राद्वारे आणि त्याची एक प्रत अर्जदारास A9, H.No 201 करिष्मा सोसायटी जवळ संगम प्रेस कोथरूड, पुणे, पुणे, महाराष्ट्र, भारत, 411038

दि. 12 ऑगस्ट 2024
ठिकाण: पुणे
अर्जदाराचे नाव –
नारी संवेदना वुमन एम्पॉवरमेंट फाउंडेशनसाठी
हस्ता/– **हस्ता/–**
आदित्य वासुदेव राव **सोनाली वासुदेव राव**
डायरेक्टर **डायरेक्टर**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-अ - अचल मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालयः- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली- 110001, फोन्सः- 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

शाखा कार्यालयः 5ए, बी, सी, डी, पाचवा मजला, श्रीरंग हाऊस, जंगली महाराज मंदिर समोर, जेएम रोड, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र- 411005.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **"जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार/सह–कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारसाचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/PUN/0719/721222 शिवानी शेलार/अरुणा सूर्यकांत शेलार/रुतुराज सूर्यकांत शेलार, शाखा: पुणे	रु. 34,69,872.97 दि. 30-09-2023 रोजी नुसार	प्रत्यक्ष	बिल्डिंग ए, पहिला मजला, 104, कलश, गट क्र. 449, 604 आणि 605 कासार, आंबोली पिरंगुट लवासा रोड पुणे, महाराष्ट्र- 412115	रु. 22,92,000/-	रु. 2,29,200/-	10.09.2024	रु. 10,000/-	30.08.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	11.09.2024 रोजी दुपारी 01:30 ते दुपारी 03:00 दरम्यान	निरंक/ ज्ञात नाही

***सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.**

(1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल/पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी/बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ- के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा/बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003 वेबसाइट- www.bankeauctions.com मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती श्री. अभिजित गायकवाड, टोल फ्री क्र.: 1800 120 8800, ई-मेल: auction@pnbhousing.com यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

स्थान: पुणे, दिनांक: 10.08.2024 **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

भेंडी, गवार, फ्लॉवर, मटारच्या दरात वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : मागणी वाढल्याने भेंडी, गवार, फ्लॉवर, वांगी, मटारच्या दरात वाढ झाली. शेवगा, घेवड्याच्या दरात घट झाली असून, अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (११ ऑगस्ट) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून पावटा आणि घेवडा प्रत्येकी २ ते ३ टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ४ ते ५ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ८ ते ९ टेम्पो गाजर, कर्नाटक, गुजरातमधून मिळून १ टेम्पो भुईमूग शेंग, तामिळनाडूतून १ टेम्पो कैरी, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ७ ते ८ टेम्पो, टोमॅटो १० ते ११ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार ८ ते १० टेम्पो, काकडी १० ते १२ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, भुईमूग शेंग ६० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा १०० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४५ ते ५० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

कांदापात, पुदिना, अंबाडी, राजगिऱ्याच्या दरात घट

पावसाने उघडीप दिल्याने पालेभाज्यांची आवक वाढली. कांदापात, पुदिना, अंबाडी, चुका, राजगिरा या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. मेथी, शेपूच्या दरात वाढ झाली आहे. कोथिंबीर, चाकवत, मुळा, चवळई, पालकचे दर स्थिर आहेत. तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर एक लाख जुडी, मेथीच्या ७० हजार जुडींची आवक झाली, अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात शेकडा पालेभाज्यांचे दर पुढीलप्रमाणे - कोथिंबीर - १००० ते १५०० रुपये, मेथी - ८०० ते १५०० रुपये, शेपू - ८०० ते १००० रुपये, कांदापात - ८०० ते १२०० रुपये, चाकवत - ४०० ते ७०० रुपये, करडई - ४०० ते ७०० रुपये, पुदिना - ५०० ते ८०० रुपये, अंबाडी - ४०० ते ७०० रुपये, मुळे - ८०० ते १५०० रुपये, राजगिरा - ४०० ते ७०० रुपये, चुका - ५०० ते ७०० रुपये, चवळई - ४०० ते ७०० रुपये, पालक - ८०० ते १५०० रुपये.

डाळिंब, खरबूज, पपई, लिंबही महाग

फळबाजारात डाळिंब, खरबूज, पपई, लिंबांच्या दरात वाढ झाली. अननस, मोसंबी, संत्री, चिकू, पेरू, सीताफळाचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी ६० ते ७० टन, संत्री ४ ते ५ टन, डाळिंब ३५ ते ४० टन, पपई ७ ते ८ टेम्पो, लिंबे १२०० ते १६०० गोणी, कलिंगड ७ ते ८ टेम्पो, खरबूज २ ते ३ टेम्पो, चिकू एक हजार खोकी, पेरू ५०० ते ६०० प्लास्टिक जाळी (क्रेट) अशी आवक झाली.

ॲक्सिस बँक लि.
नोंदणीकृत कार्यालय : त्रिशूल, ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन, एलिस ब्रीज, अहमदाबाद – ३८० ००६.
शाखा कार्यालय : ॲक्सिस बँक लि., स्टर्लिंग प्लाझा, तळमजला, साई सेवा पेट्रोल पंप समोर, जे.एम.रोड, पुणे-४११००४.
ताबा नोटीस (रुल ८(१))

ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार यांना खालील नमूद तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून **६० दिवसांच्या** आत परत करावी. कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: खालील नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील नमूद तारखांना **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास नमूद केलेल्या रकमेसाठी **ॲक्सिस बँक लि.** च्या रकमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांची नावे आणि पत्ते	तारखेनुसार थकबाकी (रू.)
१.	**१) हायड्रोकॉन्स सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) २) श्री. किरण बाळकृष्ण मोकाशी (जामीनदार) ३) सौ. प्राजक्ता बाळकृष्ण मोकाशी (जामीनदार) ४) श्री. सतीश बाळकृष्ण मोकाशी (जामीनदार) ५. विश्वास बाळकृष्ण मोकाशी (जामीनदार) रा :** युनिट नं.६, प्लॉट नं.३३, दि न्यू इंडियन इंड इस्टेट, गिरीकुंज इंड इस्टेट जवळ, ऑफ महाकाली केव्हज रोड, अंधेरी ईस्ट, मुंबई ४०००९३, **तसेच :** १०३/४, अस्मिता मोगरा दत्त जगदंबा रोड, साखळकर हॉस्पिटल समोर, अंधेरी चकाला, एमआयडीसी, मुंबई – ४०००९३, **तसेच :** १–७० एम.एच.नं.३८एच, बोरीची चाळ, कापरेश्वर मार्ग, फणसवाडी काळबादेवी, मुंबई ४००००२, **तसेच :** २४/३७७बी, श्रीपाद बिल्डिंग, दुसरा मजला, व्ही.पी. रोड, बदाम वाडी ग्रँट रोड (पूर्व) मुंबई ४००००४.	**रु. २,२७,९१,३१५.३९/– (रुपये दोन कोटी सत्तावीस लाख एक्याण्णव हजार तीनशे पंधरा आणि एकोणचाळीस पैसे फक्त) दि.०४/१२/२०२२** रोजी देय रक्कम आणि (हि रक्कम फक्त पर्यंत लागू केलेले व्याज समाविष्ट आहे) आणि त्यावरील सदर रक्कम परत करेपर्यंतचे करारानुसार झालेले/होणारे व्याज, अनुषंगिक खर्च, शुल्क व्याजासहीत.
	मागणी नोटीसीची तारीख : ०४/१२/२०२०	**प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख : ०९/०८/२०२४**
	गहाण मालमत्तेचे तपशील : फ्लॅट नं.४०४ चे सर्वसामाईक भाग, क्षेत्रफळ १३००.चौ.फुट. (मान्य विक्रीयोग्य बिल्ट-अप क्षेत्र) सोबत संलग्न टेरेस क्षेत्रफळ सुमारे १५३. चौ.फुट., आनंद को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग लिमिटेड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये आनंद रेसिडेन्सी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिल्डिंगच्या 'सी' विंगमधील चौथ्या मजल्यावर कव्हर्ड पार्किंग स्पेस नं.१५ सह 'सी' विंगमधील अप्पर पार्किंग एरियामध्ये, सर्वे नं.२३२ हिसा नं.१+२ वर बांधण्यात आलेले, लोहेगाव, ता.हवेली, जि.पुणे आणि **चतु:सीमा : पूर्वेकडे :** ओपन आणि पॅसेज, **पश्चिमेकडे :** ओपन, **दक्षिणेकडे :** फ्लॅट नं.४०३ सी-विंग, **उत्तरेकडे :** ओपन.	

दिनांक : ०९/०८/२०२४
ठिकाण : पुणे
(टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)
सही/–
अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.

कलावंतांची मुस्कटदाबी कितपत योग्य?

(पान १ वरून) चित्रांविषयी प्राध्यापिका आणि चित्रकार शुक्ला विनायक सावंत यांचे व्याख्यान झाले. महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या शुभांगी दामले आणि कला गजर संस्थेचे संदेश भंडारे या वेळी उपस्थित होते. 'व्यवस्थेविरुद्ध बंडखोरी करून जाहीरपणे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य कलाकाराला आहे. या स्वातंत्र्याचा संकोच झाल्यावरही आम्ही गप्प बसणार असू, शासनाच्या अनुदान आणि पुरस्कारापोटी बोटचेपी भूमिका घेणार असू, तर आजूबाजूला अंधःकारच आहे, असे म्हणावे लागेल. कलावंत अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी झगडा देत असतात. पण, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, असे सांगायला आम्ही रसिक मंडळी का नसतो,' असा प्रश्न उपस्थित करून पालेकर म्हणाले, 'जी संहिता छापली जाऊ शकते ती रंगमंचावर सादर करायला काय हरकत आहे? नाटक बघण्याचा रसिक म्हणून असलेला अधिकार आम्ही का वापरत नाही? एखाद्या नाटकाचा मूठभर लोकांसमोर प्रयोग झाल्यावर त्यातून भावना दुखावल्या गेल्या म्हणून ते बंद पाडले जाते. बंद पाडणारे तक्रार करतात आणि त्यावरून पोलीस नाटक सादर करणाऱ्या कलाकारांवर कारवाई करतात. अशी टोकाची विरोधी भूमिका घेतल्यानंतरही आम्ही पुन्हा गप्प बसतो, ही गोष्ट मला अस्वस्थ करते. गप्प बसून खतपाणी घालण्याचे काम तरी सुसंस्कृत नाट्यरसिक म्हणून बंद करू या.'

वणव्यानंतर पुन्हा फुलणाऱ्या नव्या वनस्पतीचा शोध

तळेगाव दाभाडेनजीकच्या कुरणांमध्ये 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा'चे अस्तित्व

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गवताळ कुरणांना लागणाऱ्या वणव्यात बहुतांश वनस्पती भस्मसात होतात. मात्र, वणव्यांमध्ये तगून राहून पुन्हा फुलणाऱ्या नव्या वनस्पतींचा शोध नुकताच संशोधकांनी लावला आहे. 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा' असे नाव असलेली वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडेजवळच्या गवताळ कुरणांमधून शोधण्यात आली आहे.

वनस्पती अभ्यासक आदित्य धारप यांच्यासह आघारकर संशोधन संस्थेमधील डॉ. मंदार दातार आणि भूषण शिगवण यांनी या वनस्पतीचे संशोधन केले. या संशोधनाचा शोधनिबंध इंग्लंडमधून प्रकाशित होणाऱ्या 'क्यू बुलेटिन' नावाच्या संशोधनपत्रिकेत नुकताच प्रसिद्ध झाला.

लंडनच्या क्यू बॉटॅनिक गार्डन येथील जागतिक कीर्तीचे वनस्पती तज्ज्ञ डॉ. आयेन डर्बीशायर यांनीही या वनस्पतीच्या नवे असण्याला दुजोरा दिला. आगीशी सामना करून जिवंत राहणाऱ्या काही निवडक वनस्पतींमध्ये 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा' या वनस्पतीचा समावेश होतो. इंग्रजीत या वैशिष्ट्याला 'पायरोफायटिक' असे म्हणतात. आफ्रिकेच्या आणि ऑस्ट्रेलियाच्या मैदानी, गवताळ प्रदेशात आगीच्या प्रकोपानंतर फुलोऱ्यावर येऊन आगीनंतरच्या परिस्थितीचा स्वतःसाठी उपयोग करून घेणाऱ्या अनेक वनस्पती आढळतात. मात्र, भारतातून आणि नोंदल्या गेलेल्या थोड्याच वनस्पतींमध्ये 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा'चा समावेश होतो.

'पायरोफायटिक' प्रकारातील या वनस्पती फुलण्यासाठी किंवा बीजप्रसारासाठी पूर्णपणे आगीवर अवलंबून असतात. मात्र, 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा' फुलण्यासाठी पूर्णपणे आगीवर अवलंबून न राहता आगीनंतरच्या परिस्थितीचा स्वतःसाठी उपयोग करून घेते. या वनस्पतीचे फुलण्याचे दोन टप्पे आहेत.

पहिल्या टप्प्यात पावसानंतर साधारण नोव्हेंबर महिन्यात ही पहिल्यांदा फुलायला लागते. हिवाळा सरताना अनेक ठिकाणी स्थानिकांकडून किंवा शिकाऱ्यांकडून वणवे लावले जातात. अशा वेळी या वणव्यात बहुतांश गवत, झुडपे पूर्णतः जळून जातात. अशा परिस्थितीत 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा'चे अस्तित्व निव्वळ जमिनीखालील जाडजूड मुळापुरतेच शिल्लक राहते. बऱ्याच वनस्पती अशा वणव्यानंतर पावसाळ्याच्या पहिल्या सरीची वाट बघत निद्रितावस्थेत जातात. मात्र 'डिक्लीपटेरा पॉलिमॉर्फा'ला अशा आगीच्या प्रकोपानंतर काहीच दिवसांत एप्रिल-मेच्या दरम्यान परत धुमारे फुटतात. हे धुमारे बरेचदा फक्त फुले असणारे अत्यंत केसाळ पुष्पदंड असतात.

आगीनंतर मुबलक उपलब्ध झालेल्या पोटॅश खताचा आणि परागीभवन करणाऱ्या कीटकांना सहज आकर्षून घेता येईल अशा परिस्थितीचा या वनस्पतीला उपयोग होतो. या स्थितीत फुलांचे पटकन परागीभवन होऊन पावसाळ्याच्या आधी बीजप्रसार होतो. त्यामुळे पावसाळा सुरू झाल्यावर हे बुटके फुटवे लुप्त होऊन नवीन मोठे नेहमीचे फुटवे येऊन चक्र सुरू राहते, असे डॉ. दातार यांनी सांगितले.

आफ्रिकेतील प्रजातींशी नाते

भारतात आढळणाऱ्या 'डिक्लीपटेरा'च्या कुठल्याच प्रजातीत अशा प्रकारे दोनदा फुलणे आजवर नोंदवले गेलेले नाही. मात्र, आफ्रिकेतल्या काही 'डिक्लीपटेरा'च्या दोन-तीन जाती आगीनंतर फुलतात. त्यामुळे आफ्रिका खंडातल्या 'डिक्लीपटेरा' प्रजातींशी नाते सांगणारी ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती ठरते, असे आदित्य धारप यांनी सांगितले.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रासहल

श्रीरामकृष्ण- कुरुक्षेत्र- महाभारतकथा- वृंदावन- कथाकार- अजेयबुवा- सज्जनगड- ०१-०१-२०२५// गिरनार- परिक्रमा- सौराष्ट्रदर्शनसह- ०६-११-२०२४// मध्यप्रदेश- २३-११-२०२४// सिक्कीम- दार्जिलींग- लाचुंगसह- १२-११-२०२४// कुरवपुर- पिठापुर- पुरीकोणार्कसह- १४-१०-२०२४/ १६-१२-२०२४// नर्मदापरिक्रमा- ०५-११-२०२४/ २१-११-२०२४/ १६-१२-२०२४// नैमिष्यारण्य- त्रिस्थळीयात्रा- अयोध्येसह- २५-११-२०२४// चारधामयात्रा- १४-१०-२०२४/ कर्नाटक- १५-१०-२०२४// राजस्थान// केरळ- तामिळनाडू// बापट- 9137001395/ 9820023106
0070897793-10

दोस्ती टूर * नर्मदा परिक्रमा * कुरवपूर- पिठापूर * चारधाम * त्रिस्थळी- नैमिष्य- अयोध्यासह * केरळा- तमिळनाडू * कोस्टल कर्नाटका * भूतान * नेपाळ * कुरुक्षेत्र- आग्रा * दुबई * श्रीलंका. 9594880123/ 9702251584.
0070915287-2



70905414

जाहिरातविषयक

HIGHTECH Mumbai's Experts (Sarvodaya Advertising) स्वस्त/ सर्वच वर्तमानपत्रांमध्ये लीगल/ टेंडर/ सोसायटी शेअर सर्टिफिकेट/ एग्रीमेंट/ कंपनी शेअर/ पब्लिक नोटीसच्या प्रसिद्धीसाठी 321989026/ 9322277986.
0070908558-1

हेल्थ व फिटनेस

Natural Fitness Course for Male Happy Marriage Life.Satyam Clinic, Near Kate Puram Chowk, Pimple Gurav, Pune. Contact : 9623060011
0090353518-1

नावात बदल

I have changed my name Talcha Ram Suthar to Talsaram Tagaji Suthar as per document.
0090356726-5

I Abhijeet Vasant Shende have changed my child's name Roneet Abhijit Shende to Roniet Abhijeet Shende as per document.
0090356737-1

I Have Changed My Old name Jaspreet Prem Singh . To New Name Jaspreet Singh. as Per Documents
0090356736-1

I have changed my name Chiragkumar Dhirajbhai Mistri to Chirag Dhirajbhai Mistri as per document.
0090356726-3

I have changed my name Namrata Ajay Ingale to Namrata Rajan Redij as per document.
0090356726-4

My old name was Arjun changed to new name Arjun Kashyap as vide Affidavit no 907/ 2024 Dt 06 Aug 2024
0050247921-1

My old name Kanan Sandeep Shah changed to new name Kanan Chinmay Fichadiya after Marriage by affidavit 1280/2024 dated 23/07/24
0090356722-1

I, SHAHEEN is legally wedded spouse of No.14650771Y, Rank-HAV, Name- FAYAZ SHAIK, Age-36 Yrs., P/R/at: House No.17-6-18, Mubarak Nagar, Ponnur, Guntur, Andhra Pradesh-522124. I have changed my name SHAHEEN to SHAIK SHAHEEN, as per Affidavit No.268/2024 dated 08.08.2024 before Public Notary Pune.
0070917736-1

I have changed my name Trupti Ajitrao Gaikwad to Trupti Ajit Gaikwad as per document.
0090356726-1

I have changed my name Swati Kumari to Swati Neeraj Sharma as per document.
0090356726-7

I have changed my name Sajjad Yunusmiya Sikilkar to Sajjad Yunus Sikilkar as per document.
0090356726-2

I have changed my name Neeraj Kumar Sharma to Neeraj Sharma as per document.
0090356726-6

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

छोट्या जाहिराती स्वीकारण्याची केंद्रे

औंध
सुयोग एन्टरप्रायझेस
सी/ओ संदीप बुक स्टॉल, स्वजस कॉम्प्लेक्स, परिहार चौक, औंधगाव, पुणे-७. मोबा. ९४२२०१११८१.
चोरडिया कम्युनिकेशन्स
अर्षद अजित चोरडिया, १७/१८, औंधगाव, कॉसमॉस बँक लेनसमोर, औंध, पुणे-७. फोन २५८८६११८, ९९६०१११२२३.
श्रद्धा ॲड्स
श्रीमती उज्ज्वला कोटबागी 'ए' विंग, वास्तु-सुंदर, कुमार क्लासिकजवळ, पुणे-७. मोबा. ९३७१०५५७९९
अप्पा बळवंत चौक
मे. व्ही. व्ही. मेढी
वरुण मेढी, १५३, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराजवळ, 'गणराज बुक्स'समोर, डीटीडीसी कुरिअरच्या वर, दुसरा मजला, पुणे-२. फोन ९०२८९६७५०५, ८७९३६४७५०५, (०२०) २४४९२१४९
बिबवेवाडी
ॲड सर्व्हिस
अमोल नलावडे, स.नं. ६५९/२८, राजीव गांधीनगर, अप्पर शेवटचा बसस्टॉप, बिबवेवाडी, पुणे-१७. मोबाईल ९४२०७२९९१४, ९०२१८५१४६०
आकाश ॲडव्हर्टाझिंग
सी. एस. सवार, ६४५/१, शॉप नं. ४, रासकर कॅम्पस, बिबवेवाडी मेन रोड, बिबवेवाडी, पुणे-३७. मो. ९९२२२२१२६१.
बाजीराव रोड
श्री गणेश ॲडव्हर्टायझिंग
आर. निर्मला, आर. रवी, 'रेमेडी', १९२९, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-३०. फोन २५२३२७६२, मोबा. ९९२२२०९८५.
बंडगार्डन
ॲपेक्स ॲडव्हर्टायझिंग
मापदान फिर्लोश, ऑफिस नं. २६-६-७-८, अशोका मॉल, सन ॲण्ड सॅन हॉटेलसमोर, बंडगार्डन रोड, पुणे.
भवानी पेठ
ग्लोब एन्टरप्रायझेस
तन्वीर रेहमान शेख, ७१८, भवानी पेठ, पूना कॉलेज रोड, पुणे-१. मोबा. ९८९००७३८८३.
भोसरी
संवाद ॲड्स.
गवळी बिल्डींगजवळ, पुणे-नाशिक रस्ता, भोसरी, पुणे-३९.
चिंचवड
ॲपेक्स ॲडव्हर्टायझिंग
श्री. आशफाक ए.शेख, सी-२५, एमआयडीसी कमर्शियल बिल्डिंग नं. १, आयबीएमआर कॉलेजजवळ, चिंचवड, पुणे. फोन २७४७०२८२, मोबा. ९८२२७९२५८३.
मयुरेश्वर एन्टरप्रायझेस
लोकेश बलकवडे, चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे. मोबा. ९४२२०८२१६४.
राका ॲडव्हर्टायझिंग
श्रीमती विमल बाफना, राका चेंबर्स, मुंबई-पुणे रस्ता, चिंचवड स्टेशन, पुणे-१९. फोन २७४७५०५५, २७४७२२५०.
कॅम्प
ॲड इंडिया
ऑफिस नं. १०२, पहिला मजला, स्टर्लिंग सेंटर, हॉटेल अरोरा टॉवरसमोर, म. गांधी रस्ता, पुणे-१. फोन २६१३१९९३, २६१३५६५९, मोबा. ९४२२०८३६७०.
हिंदुस्तान ॲडव्हर्टायझिंग एजन्सी
श्री. हिरो सुरतानी, ७, गितांजली कुंज, नेहरू मेमोरियल हॉलसमोर, आंबेडकर रस्ता, पुणे-१. फोन २६१३८११३, २६१३३५१०, ९८२२१९२१८१, ७७७४०३२१८१ फॅक्स २६१३१४८७.
मिनत ॲडव्हर्टायझिंग
मुकुंद सायगांवकर, ८२७/७, दस्तूर मेहेर रस्ता, कॅम्प, पुणे-१. फोन २६१३०५४२.
दापोडी
व्हेंटेज ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटिंग
ए-१७, 'सी' बिल्डिंग, तिसरा मजला, काटे रेसिडेन्सी, दापोडी रेल्वे स्टेशनजवळ, दापोडी, पुणे-४११०१२. फोन २७१४३२४३. मोबा. ९८२२८४७२५६, ९८२२१३२५००.
डेक्कन
प्राजक्ता ॲडव्हर्टायझिंग
श्री. सुधनवा जाधव, ग्रीटवेल, १२५०, डेक्कन जिमखाना, फर्गसन कॉलेज रोड, पुणे-४. फोन २५५३१४०९, ६६०१४१३२.